# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील शाळांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सोयीसुविधा व निधी उपलब्ध होण्याबाबत

**(१) १८३१ (२२-१२-२०१४). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना व्यवसायिक शिक्षण मिळावे तसेच उद्योगशिल बनावे या करिता इयत्ता आठवीपासून व्यावसायिक शिक्षण देण्याची तरतूद राज्यातील एक लाखापेक्षा जास्त असलेल्या शाळांपैकी केवळ दोन हजार शाळांमध्येच असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मुख्याध्यापक, संस्थाचालक यांना अनेक अडचणींना सामना करावा लागत आहे या अभ्यासक्रमासाठी लागणारे मनुष्यबळ, साहित्य, सोयीसुविधा प्रशासनाकडून पुरविल्या जात नाही तसेच पुरेसा शासकीय निधीही उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०१-२०१७) :** (१) नाही.

व्यवसाय शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर (Vocational Education at Secondary & Higher Secondary Stage) ही योजना सुरु करताना केंद्र शासनाने इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी मध्ये व्यवसाय विषय हा मुख्य विषय म्हणून समाविष्ट करण्याबाबतचे निर्देश दिले होते. त्यानुसार व अन्य काही निकषानुसार राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थातर्फे चालविण्यात येत असलेल्या ३५० माध्यमिक शाळांमध्ये सन २०१५-१६ पासून व व १६४ माध्यमिक शाळांमध्ये सन २०१६-१७ पासून

National Skill Qualification Framework (NSQF) यावर आधारित व्यवसाय विषय सुरु करण्यास केंद्र शासनाची मंजूरी मिळालेली आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, भगुर, सटाणा, सिन्नर, नांदगांव, इगतपुरी आदि नगरपरिषदेतील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे ग्रॅच्युयटी प्रॉव्हिडंट फंड व अन्य देणीबाबत**

**(२) २३१५० (११-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, भगुर, सटाणा, सिन्नर, नांदगांव व इगतपुरी आदि नगरपरिषदेतील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे ग्रॅच्युयटी, प्रॉव्हिडंट फंड व अन्य देणी अनेक वर्षांपासून नगरपरिषदेकडून मिळण्यापासून सेवा निवृत्त कर्मचारी वंचित राहिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे,

(३) असल्यास, सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना नगर परिषदेकडून त्यांचे येणे असलेले देयके मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे वा करीत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) सिन्नर नगरपरिषदेच्या एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कागदपत्रांच्या पूर्तता अभावी देय रक्कम प्रलंबित असून कागदपत्रांच्या पूर्तता झाल्यानंतर सदरील रक्कम तात्काळ अदा करण्यात येईल.

सटाणा नगरपरिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचारी यांचे माहे ऑगस्ट, २०१५ अखेर उपदान रु. ४९,०६,१२३/- रजारोखीकरण रु. ३२,३२,५२८/- व अंशराशिकरण रक्कम रु. २७,९६,१६३/- अशी एकूण रक्कम प्रलंबित आहे.

भगुर नगरपरिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रक्कम रु.०२,०२,१७७/- अदा करणे बाकी आहे. सदर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देय असलेली उपदान व रजावेतन रक्कम मार्च २०१७ अखेर पूर्ण अदा करण्याचे नियोजन केले आहे.

इगतपुरी नगरपरिषदेच्या ४ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे अंशराशिकरण, उपदान व रजावेतन एकूण रक्कम रु. १५,०८,४३५/- लेखापरीक्षण आक्षेप असल्याकारणाने सदर कर्मचाऱ्यांचे लाभ प्रलंबित आहे.

नांदगाव नगरपरिषदेने सेवानिवृत्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर, २०१७ अखेर रु. १० लक्ष रक्कम अदा करावयाचे नियोजन आहे.

सर्व थकीत लाभ व लाभाच्या रक्कमा अदा करणेबाबत संबंधित मुख्याधिकारी यांना सुचित केलेले आहे.

नगरपरिषदांनी स्वनिधीतून कर्मचाऱ्यांची देणी अदा करणे अपेक्षित असून त्याकरीता उत्पन्न वाढीसाठी व खर्चाचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक आहे.

---

## दक्षिण सोलापूर मतदार संघातील प्राथमिक शाळांना संगणक संच पुरविण्याबाबत

**(३) २६९८५ (१०-०८-२०१६). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शाळांना संगणक संच पुरविण्याची शासनाची योजना असून सदरील योजनेतून दक्षिण सोलापूर मतदार संघातील किती व कोणत्या शाळांना संगणक संच पुरविण्यात आले आहेत,

(२) असल्यास, उर्वरित शाळांना केव्हापर्यंत संगणक संच पुरविण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१७) :** (१) व (२) दक्षिण सोलापूर मतदार संघातील ८० प्राथमिक शाळांना ई-लर्निंग योजनेंतर्गत जिल्हापरिषदेच्या स्थानिक निधीमधून संगणक संच पुरविण्यात आले आहेत. तथापि, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या शालेय शिक्षण विभागाच्या उपक्रमातून राज्यातील तंत्रस्नेही शिक्षकांनी तयार केलेली शैक्षणिक प्रणाली स्वनिर्मित व मोफत प्राप्त होत असल्यामुळे त्याचा वापर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाण्यातील नौपाडा येथील सरस्वती विद्यामंदीर या मराठी शाळेच्या आवारातच इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु होत असल्याबाबत

**(४) ३९८५१ (२५-०५-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील नौपाडा येथील सरस्वती विद्यामंदीर या अनुदानीत आणि नावाजलेल्या मराठी शाळेच्या परीसरात सीबीएससी बोर्डाची इंग्रजी शाळा सुरू करण्याचा घाट ट्रस्टींनी घातल्यामुळे पालकांचा त्याला तीव्र विरोध होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी माध्यमाच्या शाळेला मिळणारे शासकीय अनुदान अपुरे असून त्यातून मराठी माध्यमाची शाळा चालवणे व चांगल्या सोयी- सुविधा पुरवणे शक्य होत नसल्याने इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करून त्यातून मिळणाऱ्या डोनेशन वर मराठी माध्यमाची शाळा अधिक दर्जेदारपणे चालवू असे खुलासे ट्रस्टींनी पालकांसमोर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी माध्यमाच्या शाळेचे अस्तित्व धोक्यात आले असून, एकाच आवारात दोन्ही शाळा सुरू झाल्यास मराठी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा कल कमी होऊन त्या शाळेला भविष्यात धोका निर्माण होईल अशी भीती पालकांकडून व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठी माध्यमात शिकणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांचा विरोध लक्षात घेता, सदर इंग्रजी माध्यमीक शाळेचे अन्य ठिकाणी स्थानांतरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०१-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**"बालभारती" माध्यमातून चालणा-या अभ्यास मंडळाच्या बैठकांचे आयोजन करण्यात येत नसल्याबाबत**

**(५) ४१२१५ (२५.५.२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय पातळीवरील कला, शारिरीक शिक्षण विषयाच्या अभ्यासक्रम निर्मितीसाठी "बालभारती" च्या माध्यमातून चालणा-या अभ्यास मंडळाच्या बैठका काही काळापासून बंद करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतून या विषयांसाठी तज्ज्ञ निवडीसाठी ऑनलाईन प्रक्रिया ही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे व सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (११.१.२०१७) :** (१) नाही. सदर विषयांसाठी आवश्यकतेनुसार सभांचे आयोजन करण्यात येते.
(२) व (३) कला व शारिरीक शिक्षण विषयांसाठी तज्ञ निवडीसाठी ऑनलाईन प्रपत्र भरून घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, सदर प्रपत्रांची छाननी करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) येथील प्राथमिक शाळेला अनुदान मिळण्याबाबत**

**(६) ४२६५६ (१६-०५-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) येथील प्राथमिक शाळेला गेल्या २५ वर्षापासून अनुदान मिळाले नसल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असून याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आयसीटी योजने अंतर्गत कार्यरत कंत्राटी पध्दतीच्या शिक्षकांना सेवेत कायम करण्याबाबत**

**(७) ४४८९९ (१६-०५-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्र शासन पुरस्कृत ८ हजार आयसीटी योजने अंतर्गत कार्यरत कंत्राटी पध्दतीच्या हजारो शिक्षकांनी सेवेत कायम करावे, यासाठी आंदोलन केले होते तसेच याबाबत दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी मा.शिक्षण मंत्री यांची विधानभवनात बैठक घेतली असता ६ महिन्यात धोरणात्मक निर्णय घेऊन शिक्षकांना बेरोजगार होऊ देणार नाही असे आश्वासित करुनसुध्दा आजतागायत कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच केंद्र शासनाने आयसीटी योजने अंतर्गत राज्यात कार्यरत असलेल्या शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र सर्व श्रमिक संघाचे औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नाशिक येथे केंद्र सरकार पुरस्कृत आयसीटी संगणक शिक्षण योजनेतील गत वर्षात ५०० शाळांमधील संगणक लॅब बंद झाल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील २५०० शाळांमधील संगणक कक्षाचा करार संपुष्टात येत असून सुमारे अडीच हजार संगणक शिक्षकांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, आयसीटी योजने अंतर्गत कार्यरत असणा-या संगणक शिक्षकांना शासन पंजाब, हरियाणा आदी राज्यांप्रमाणे सेवेत कायम करण्याविषयी निर्णय घेणार आहे काय,
(६) तसेच उपरोक्त शिक्षकांना सेवेत कायम करण्याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) आयसीटी योजना टप्पा निहाय ५ वर्षे कालावधीसाठी राबविण्यात येते. सदर योजनेचा टप्पा १ सन २००७-०८ ते २०१२-१३ या कालावधीत तर टप्पा २ सन २०१२-१३ पासून राबविण्यात येत आहे.
(५) व (६) आयसीटी योजनेंतर्गत एजन्सीबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यातील कलम ८.५ नुसार ऑपरेटरद्वारा नियुक्त करण्यात आलेल्या संगणक निदेशकांना शासन सेवेत सामावून घेण्याचा तसेच कायम सेवेचे फायदे घेण्याचा कोणताही अधिकार असणार नाही. त्यामुळे सेवेत कायम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील सीआरझेडबाबतच्या अटी शिथिल करण्याबाबत**

**(८) ४८०९५ (२८-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोस्टल कामासाठी किनारपट्टी लगतचा निकष शिथिल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील ठिक-ठिकाणच्या ४५ कामांमध्ये अडचण असलेल्या सीआरझेडबाबतच्या अटी शिथिल करण्याचा त्यात समावेश आहे काय व ही ठिकाणे जिल्हयातील कोणत्या तालुक्यातील आहेत,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. रामदास कदम (१३-०२-२०१७) :**(१), (२) व (३) सी.आर.झेड विषयक अटी शिथिल करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे.

सी.आर.झेड अधिसूचना, २०११ संदर्भात महाराष्ट्र राज्यातील सी.आर.झेड क्षेत्रात येणाऱ्या अडी-अडचणींचा विचार करुन त्या संदर्भातील उपाययोजना सुचविण्यासाठी केंद्र शासनाने दिनांक १७ जून, २०१४ च्या आदेशान्वये सचिव, मिनिस्ट्री अर्थ सायंन्सेस यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. सदर समितीची दिनांक ८ जुलै, २०१४ रोजी मुंबईत बैठक संपन्न झाली असून त्याबाबतचा अहवाल समितीमार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्यातील बी.एड महाविद्यालये विद्यार्थीअभावी ओस पडल्याबाबत**

**(९) ४९६७२ (१२-०५-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बी.एड. अभ्यासक्रमाची प्रवेश पात्रता परिक्षा दिनांक २५ जुलै, २०१५ रोजी होऊनही प्रवेशाअभावी महाविद्यालये ओस पडल्याने, प्राध्यापक, सेवकांना वेतनाविना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शासनाने विद्यार्थ्यांची प्रवेशक्षमता निम्यावर आणली असून सर्वच बी.एड महाविद्यालयांना शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची अट घालण्यात आली असल्याने, पहिल्या सेमिस्टरची मुदत संपली तरी शासनाने ना-हरकत प्रमाणपत्र दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बी.एड, डी,एड. साठी प्रवेश देतानाच नोकरीची शाश्वती नाही, तरीही ज्यांना शिकायचे आहे त्यांनी प्रवेश घ्यावा असे शासनाने करण्याबाबतची कारणे काय आहेत ,

(४) असल्यास सद्य: स्थितीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीेने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-१२-२०१६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०१५ मध्ये राज्य शासन व महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोशिएशन अशा दोन्ही स्तरावर बी.एड अभ्यासक्रमाच्या प्रवेशासासाठी सामायिक प्रवेश परीक्षा घेण्यात आली. तथापि, प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याने सदर अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त राहिल्या.

(२) एनसीटीईच्या National Council for Teacher Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, २०१४अनुसार बी.एड महाविद्यालयांची प्रवेश क्षमता एका युनिटला ५० विद्यार्थी अशी निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने राज्यातील बी.एड अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयांना यापूर्वी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे, अशा महाविद्यालयांना दिनांक ११.७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(३) बी.एड अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेश देतानाच नोकरीची शाश्वती देता येत नाही असा उल्लेख करण्यात आलेला नाही. तथापि, राज्यात खूप मोठया प्रमाणात डी.एड कॉलेजेसची स्थापना झाली असून, सदर कॉलेजमधून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही मंजूर शिक्षकांच्या संख्येपेक्षा खूप जास्त आहे. शासनामार्फत प्रत्येकाला शिक्षक म्हणून नोकरी उपलब्ध करुन देणे शक्य नाही. सबब, प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थींना नोकरी मिळेलच याची खात्री देता येणार नाही, ही सद्य:स्थितीदर्शक वस्तुस्थिती आवर्जून नमूद करण्याचे आदेश संचालक (SCERT), पुणे यांना देण्यात आलेले आहेत.

(४) केंद्र शासनाच्या एनसीटीई, नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या धोरणानुसार राज्यातील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम राबविले जातात. राज्यात शिक्षकांच्या आवश्यकतेपेक्षा प्रशिक्षित शिक्षकांचे वाढते प्रमाण विचारात घेऊन, राज्यातील नवीन शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम/वाढीव प्रवेश क्षमतेस मंजूरी देण्यात येऊ नये, असे एनसीटीईला वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मुकबधीरांच्या उच्च शिक्षणाबरोबरच इतर सर्व अपंग पाल्यांकरीता सर्व समोवशक शैक्षणिक नियोजन करण्याबाबत

**(१०) ५२०५७ (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुकबधीर विद्यार्थ्यांच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक तसेच पदवी शिक्षणाकरीता आजपर्यंत निश्चित अभ्यासक्रम ठरवण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुकबधीरांच्या उच्च शिक्षणाबरोबरच इतर सर्व अपंग (दिव्यांग) पाल्यांकरीता त्यांचा अभ्यासक्रम, अभ्यासपध्दती, परिक्षापध्दती, मुल्यांकन पध्दती याबाबत सर्व समोवशक शैक्षणिक नियोजन करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०१-२०१७) :** (१) सर्वांसाठी शिक्षण आणि सर्व समावेशक शिक्षण हा शिक्षणाचा महत्वाचा मध्यवर्ती हेतू आहे. त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता वेगळा अभ्यासक्रम न करता त्यांना विषयनिहाय सवलती उपलब्ध करून दिलेल्या आहेत. याचा लाभ सर्व विद्यार्थी घेत आहेत.

(२) व (३) दिव्यांग विद्यार्थ्यांना इ.१ ली ते १२ वी पर्यंतच्या परीक्षेमध्ये गरजेनुसार सवलतींचा लाभ देण्याबाबत शासनाच्या दिनांक ८ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षण/विद्यापीठीय शिक्षणामधील परीक्षापध्दतीमध्ये द्यावयाच्या सोयीसुविधांबाबत उच्च शिक्षण संचालनालयाच्या स्तरावर समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाड्यातील प्रलंबित पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत**

**(११) ५३८७५ (१०-०८-२०१६). अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील पाणी पुरवठा योजनांकरीता कोट्यवधी खर्च करून देखील पाणीपुरवठा सुरळीत नसल्याचे करण्यात आलेल्या लेखापरिक्षणामध्ये निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील ७६ तालुक्यात, ६६५६ ग्रामपंचायती व ८३३५ गावांसाठी एकूण १०,६८५ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या असून त्या प्रलंबित असल्याचे, त्याचप्रमाणे काही योजनांचे वीज बिल देखील थकल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यातील १०,६८५ पाणी पुरवठा योजनांचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून लेखापरिक्षण करून सदर योजनांचा मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेश करण्याचा निर्णय दिनांक ११ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त वीज बिल थकल्याचे व पाणीपुरवठा योजना प्रलंबित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०२-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. मराठवाड्यातील ७६ तालुक्यात दि.०१.०४.२०१६ (IMIS) च्या आकडेवारी नुसार ६६४५ ग्रामपंचायती व ८२९५ गावांसाठी एकूण १०५९१ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत व ४९४ पाणी पुरवठा योजना प्रगती पथावर आहेत. काही योजनांचे वीज बील थकीत आहे.

(३) अ) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नवीन प्रस्तावित असलेल्या योजनांपैकी सुरु न झालेल्या मरावड्यातील एकूण २५१ योजनांचा (३४७ गावे/वाड्या/वस्त्यांची) मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेत करण्याचा तसेच

ब) मरावड्यातील पुनरुज्जीवीत करावयाच्या एकूण ४३ योजनांचा मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेश करण्याचा निर्णय दिनांक ७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे घेण्यात आला आहे.

(४) अ) योजनेचा उद्भव कोरडा असल्यामुळे
ब) योजनेच्या उद्भवाची जागा बदलल्यामुळे
क) योजनेच्या समिती अंतर्गत वाद असल्यामुळे
ड) कोर्ट केसेसमुळे
इ) योजना सुधारित झाल्यामुळे
फ) ठेकेदाराकडून कामाची गती कमी झाल्यामुळे

(५) मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गत नवीन योजना तसेच बंद पडलेल्या योजनांचे पुनर्रुज्जीवन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत

**(१२) ५४११२ (२२-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत धनगर समाजाच्या नेत्यांनी मा. मुख्यमंत्री यांच्या समवेत दिनांक २६ मे २०१६ रोजी वा त्या सुमारास मुंबई येथे झालेल्या चर्चेमध्ये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी शासन सकारात्मक भूमिका घेईल असे आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) विविध संघटनांनी दिलेली निवेदने विचारात घेता, भविष्यात जातीय तेढ निर्माण होऊन विद्यापीठाच्या निकोप विकासाला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी सोलापूर विद्यापीठाचे नाव सोलापूर विद्यापीठ असेच राहील असा सर्वानुमते निर्णय सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये घेण्यात आला आहे. तथापि, दिनांक २६/०५/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी सोलापूर येथील विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव देण्याबाबत प्रस्ताव तयार करून तात्काळ सादर करण्यात यावा असे निदेश दिले आहेत. याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक शिक्षण संस्थाचा दर्जा देण्याबाबत**

**(१३) ५४२३७ (२२-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विशिष्ठ समाजाच्या शिक्षणसंस्थांना अल्पसंख्याक दर्जा देताना किंवा त्या चालविताना त्याच समाजातील किमान ५१ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश दिलाच पाहिजे, हे बंधन योग्य नसल्याचा महत्वाचा निर्णय अल्पसंख्याक शिक्षण संस्थांच्या राष्ट्रीय आयोगाने दिला असून त्याची अंमलबजावणी आगामी शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याची सूचना दिली असल्याचे माहे मे, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आयोगाच्या या निर्णयामुळे अल्पसंख्याक संस्थामधील शिक्षणाच्या बाजाराला मुक्तद्वारे मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयोगाच्या या निर्णयाविरोधात शासनाने उचित निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच राज्यातील किती शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक शिक्षण संस्थेचा दर्जा देण्यात आला, त्याचे निकष काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, क्र. अशैसं-२०१२/प्रक्र.-२१/का-५, दि. २७.०५.२०१३ अन्वये याबाबतचे निकष विहित करण्यात आले असून आतापर्यंत २६५० इतक्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

---

**जवाहरलाल बालभवनाचे उपनगरात उपकेंद्र सुरू करण्याबाबत**

**(१४) ५५१७२ (२२.०८.२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांच्या सुप्तशक्तीचा विकास करण्यासाठी ६३ वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवनाची मुंबईतील चर्नीरोड रेल्वे स्थानक परिसरात स्थापना होवून विविध उपक्रम सदरहू बालभवनामार्फत राबविले जात असतानाही ठाणे, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई, पालघर आदी भागातील विद्यार्थ्यांना उक्त बालभवन लांब पडत असल्याने शेकडो विद्यार्थी बालभवनामार्फत सुरू असलेल्या उपक्रमांपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, जवाहर बालभवनाचे उपनगरात उपकेंद्र सुरू करून उपनगरातील विद्यार्थ्यांना उपक्रमांचा लाभ मिळावा यासाठी शिक्षक परिषदेचे अनिल बोरनारे यांनी शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे  माहे एप्रिल २०१६ मध्ये  वा त्यादरम्यान लेखी निवेदन सादर करून मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,

(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९.०१.२०१७) :**(१) सदर उपक्रम उन्हाळी, दिवाळीच्या सुट्टीत राबविण्यात येत असल्याने ठाणे, कल्याण, नवी मुंबई, पालघर आदी भागातील विद्यार्थी कमी प्रमाणात उपक्रमात सहभागी होतात.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर शहर व ग्रामीण विभागाला रेल्वेने पाणी विहिरीत सोडल्यानंतर रात्री ते टॅकर लॉबीला विकले जात असल्याबाबत**

**(१५) ५७२०६ (२२.०८.२०१६).   श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :**   सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहर व ग्रामीण विभागाला राज्य शासनाने आतापर्यंत रेल्वेद्वारे सुमारे पाच कोटी पाणी दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेल्वेने आलेले पाणी विहिरीत सोडल्यानंतर रात्री ते टॅंकर लॉबीला विकले जात असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अनेक नागरीकांनी जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे माहे एप्रिल-मे, २०१६ मध्ये तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती रेल्वेने आलेले पाणी विहिरीत सोडल्यानंतर रात्री ते टॅकर लॉबीला विकत असणा-या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७.०२.२०१६) :**(१) सन २०१६ च्या टंचाई कालावधीत लातूर शहरास रेल्वेव्दारे एकूण २५.९५ कोटी लिटर पाणी पुरविण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक शाळांचा दर्जा उंचावणेकरता शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड (रॅम्प) नसल्याबाबत**

**(१६) ५९५८७ (२२-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शाळांचा दर्जा उंचावणेकरिता शासन हजारो कोटी रुपये खर्च करत असूनही राज्यातील १०,५७० शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड (रॅम्प) नसल्याचे व २२,५७६ शाळांमध्ये संरक्षण भिंत, तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अपंग विद्यार्थ्यासाठी उतरंड (रॅम्प) व संरक्षण भिंत बांधण्याकरिता तसेच पिण्याच्या पाण्याची सोय करण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०१-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तसेच शासनाच्या अन्य योजनेतून नियोजन करण्यात येते. तथापि, संरक्षण भिंत बांधण्याची योजनेचा समावेश सर्व शिक्षा अभियान मध्ये नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार, मोखाडा, विक्रमगड, तलासरी, डहाणू, आणि वाडा या आदिवासी बहुल (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत ८ वी व ९ वी च्या शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(१७) ६००६९ (२०-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रवेश देणे बंधनकारक असताना जव्हार, मोखाडा, विक्रमगड, तलासरी, डहाणू, आणि वाडा (जि.पालघर) या आदिवासी बहुल तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत ८ वी व ९ वी च्या शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित रहावे लागत असल्याचे दिनांक २५ मे, २०१६ रोजीवा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार जिल्हा परिषदेच्या शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना ८ वी व ९ वीत प्रवेश मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) सदर तालुक्यातील सर्व जि.प.शाळांना इ.८ वी चे वर्ग जोडण्यात आले आहेत. इ.९ वीत विद्यार्थ्यांना अतिरिक्त प्रवेश देण्यात आले आहेत. त्यामुळे कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा येथे अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह व उच्च शिक्षणाच्या सुविधा सुरु करण्याबाबत

**(१८) ६०११३ (२०-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देऊळघाट, धाड, रायपूर (ता.बुलडाणा) या अल्पसंख्यांक बहुल गावांचा अल्पसंख्यांक बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलडाणा येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरू करण्याची मागणी नागरिकांनी शासनाकडे माहे जून, २०१६ वा त्या सुमारास केली असून गावांमध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध अद्याप झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय ?
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती बुलडाणा येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरू करण्याबाबत तसेच अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अशा आशयाची मागणी शासन स्तरावर प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
तथापि, जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रमातंर्गत बुलढाणा येथे अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी १०० प्रवेश क्षमतेचे वसतीगृह इमारत बांधकामाचा प्रस्ताव सादर केला असून तो विचाराधीन आहे.
त्याचप्रामाणे बुलढाणा जिल्ह्यात उच्च शिक्षणाशी संबंधित एकुण ८७ महाविद्यालय कार्यरत असून त्यापैकी ७ महाविद्यालयांनी अल्पसंख्याक दर्जा प्राप्त केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद अकोला अंतर्गत असलेल्या शिक्षण विभागाच्या सर्व शिक्षण अभियानांतर्गत एकूण १६०८२ वाचन साहित्य पुस्तके छपाई अपहार प्रकरणाबाबत**

**(१९) ६२४१७ (२९-०८-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद अकोला अंतर्गत असलेल्या शिक्षण विभागाच्या सर्व शिक्षण अभियानांतर्गत एकूण १६०८२ वाचन साहित्य पुस्तके छपाई, अपहार प्रकरणी विभागीय आयुक्त अमरावती यांनी शिक्षण संचालक, अमरावती यांनी निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शिक्षण संचालकांनी दिनांक २८ मे, २०१५ चे आदेशान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांना कळविल्याप्रमाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश क्र. ४७७८ दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ न्वये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांना चौकशी करण्याचे आदेश दिले, हे हि खरे आहे काय?

(३) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ चे सादर चौकशी अहवालात शासनाचा निधी संगनमताने बळकावणे, निविदा प्रक्रिया पूर्व नियोजित व बनावट असणे, पदाचा दुरुपयोग करून गैरव्यवहार करणे, गैरव्यवहाराची रक्कम वसूल करणे तसेच फौजदारी कारवाई करण्यात यावी असे गंभीर दोषारोप केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिलेल्या अहवालानुसार कोणीही दोषी आढळून आलेले नाही.

---

**आष्टी (ता.आष्टी, जि.बीड) येथे तातडीने क्रीडा संकुलाचे बांधकाम सुरु करण्याबाबत**

**(२०) ६४३२२ (२२-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (ता.आष्टी, जि.बीड) येथे शासनाने क्रीडा संकुल मंजूर केले असून, क्रीडा संकुलासाठी आवश्यक असलेली शासकीय जमिन उपलब्ध झाली नसल्याने सदरहू क्रीडा संकुलाचे बांधकाम प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१६ च्या अंतिम आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू क्रीडा संकुलासाठी तातडीने शासकीय जमिन उपलब्ध करुन क्रिडा संकुलाचे बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०१-२०१७) :** (१) व (२) अंशतः खरे आहे. आष्टी तालुका क्रीडा संकुलासाठी आष्टी येथील स.न.४६३ मधील ३ हे ६६ आर शासकीय जमीन प्राप्त झालेली असून त्यापैकी ०.६६ आर जागा वादग्रस्त आहे. सदर वादग्रस्त जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे क्रीडा संकुल उभारणीस विलंब होत आहे. तथापि, वादग्रस्त जागा वगळून मोकळ्या जागेवर बांधकाम सुरु करता येऊ शकते. त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव श्री. अनिल जाधव यांच्या गैरकारभाराबाबत विद्यापीठ कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या तक्रारी**

**(२१) ६५२१६ (१६-१२-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव श्री. अनिल जाधव यांच्या गैरकारभाराबाबतच्या तक्रारी विद्यापीठ कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाकडे तसेच शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.
प्रश्नात नमूद सहाय्यक कुलसचिव यांच्या विरुध्द एका विद्यापीठ कर्मचाऱ्याने विद्यापीठाकडे तक्रार केलेली आहे. तथापि, सहसंचालक,उच्च शिक्षण यांच्याकडे तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील जे.जे.कला महाविद्यालयातील अध्यापकांच्या रिक्त पदाबाबत**

**(२२) ६५३४८ (१६-१२-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे.कला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि अधिव्याख्याताच्या एकूण ४४ पैकी ३३ पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे सप्टेबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक असलेल्या या महाविद्यालयात एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाने सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१७) :** (१) नाही. सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई येथे प्राध्यापक ८ पदे व अधिव्याख्याता ३६ पदे अशी एकूण ४४ अध्यापकीय पदे मंजूर आहेत. त्यापैकी १ प्राध्यापक व १० अधिव्याख्याता असे ११ नियमित स्वरुपात, ६ अधिव्याख्याता हंगामी स्वरुपात व १८ अधिव्याख्याता कंत्राटी स्वरुपात अशी एकूण ३५ पदे भरण्यात आली असून ९ पदे रिक्त आहेत.
(२), (३) व (४) सर ज.जी.कला महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले असून, त्यानुषंगाने आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द झाली आहे. सर ज.जी.कला महाविद्यालयातील रिक्त पदांवर नियमित अधिव्याख्याता उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी / तासिका तत्वावर अध्यापक नेमून शैक्षणिक कामकाज पार पाडण्यात येत आहे.

---

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी चालू वर्षीच्या अर्थसंकल्पात १२५ कोटींची कपात केल्याबाबत

**(२३) ६५७६२ (१६-१२-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी चालू वर्षीच्या अर्थसंकल्पात १२५ कोटींची कपात केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभियांत्रिकी शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या डॉ. गणपती यादव समितीचा सुमारे दोन वर्षापूर्वी शासनास सादर केलेला अहवाल तंत्र शिक्षण विभागाकडे धूळ खात पडलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अर्थसंकल्पात निधीची कपात केल्यामुळे अपुऱ्या निधीमुळे महाविद्यालयाची, वसतिगृहाची अनेक मोठमोठी कामे प्रलंबित राहीली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने अभियांत्रिकी शिक्षणासाठी वाढीव निधी देण्याबाबत व अभियांत्रिकी शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच शासनाने नियुक्त केलेल्या डॉ. गणपती यादव समितीचा अहवाल अंमलात आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१७) :** (१) नाही, तथापि वार्षिक योजना २०१६-१७ मध्ये तंत्रशिक्षण उप विभागासाठी विविध बांधकामांकरिता मागणी करण्यात आलेल्या रु.११३.६० कोटी नियतव्ययापैकी रु.३५.१९ कोटी इतका नियतव्यय मंजूर झाला आहे.

(२) नाही.

(३) अर्थसंकल्पात निधीची कपात करण्यात आलेली नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयात ३५ टक्के पेक्षा कमी प्रवेश झाले आहेत, अशा महाविद्यालयांविरुध्द योग्य ती कारवाई करण्याबाबत, नवीन अभियांत्रिकी महाविद्यालयांना मान्यता न देण्याबाबत, महाविद्यालयांची तपासणी करण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस कळविण्यात आले आहे. तसेच अभियांत्रिकी शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी संबंधित विद्यापीठांच्या स्थानिक चौकशी समितीमार्फत (LIC) महाविद्यालयांची तपासाणी करण्याबाबत व बृहत आराखडा तयार करण्याबाबत सर्व विद्यापीठांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**नाशिक येथील खेळाडूंना, समाजकंटकापासून त्रास होत असल्याबाबत**

**(२४) ६५९२६ (१६-१२-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, नंदूरबार या पाच जिल्हयातील, खेळाडूंच्या विकासाला चालना देण्यासाठी, राज्य शासनाने नाशिक येथे बांधलेल्या क्रिडा संकुलातील खो-खो प्रशिक्षीका श्रीमती. सावळे यांच्यासह क्रिडा संकुलात येणारे खेळाडू व महिला खेळाडूंना, समाजकंटकांकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात येत असल्याचे, दिनांक ०२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू क्रिडा संकुलात, कबड्डी, खो-खो, ॲथलेटिक्स खेळाच्या सकाळ-संध्याकाळ सरावासाठी, पुरुष खेळाडूंबरोबर महिला खेळाडू ही येत असल्याने, त्यांच्याकडे पाहून अश्लिल हावभाव, अंगविक्षेप असे प्रकार सातत्याने होत असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरहू क्रिडा संकुलातील खेळाडूंच्या सुरक्षेसाठी, संरक्षण भिंत, सुरक्षा रक्षक व लाईट व्यवस्था आदी सोयी-सुविधा त्वरित उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने, कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०१-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) विभागीय क्रीडा संकुलात लाईट व्यवस्था, सुरक्षा रक्षक आदी सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. तसेच क्रीडा संकुलाच्या ७० टक्के परीसरात संरक्षण भिंत बांधलेली असून उर्वरित ३० टक्के जागेवर तात्पुरत्या स्वरुपातील पत्र्याचे कुंपण करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंभारगाव अंतर्गत पोतेकरवाडी (ता.पाटण, जि.सातारा) गावाकरीता असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या योजनेची चौकशी करण्याबाबत**

**(२५) ६६२३५ (१६-१२-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभारगाव अंतर्गत पोतेकरवाडी (ता.पाटण, जि.सातारा) गावाकरीता भारत निर्माण योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याची योजना कार्यान्वित करण्याबाबत तसेच ए. आर. एफ. मधून योजनेची दुरुस्ती करणेकरीता शासनामार्फत निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना कार्यान्वित व दुरुस्ती करण्याकरीता ग्रामपंचायतीने बनावट ठराव करून मंजूर सदर कामे पूर्ण न करताच ग्रामसभेच्या परवानगी विनाच सदर योजनांचा निधी काढून घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाकडून मंजूर झालेल्या रक्कमा या ग्रामपंचायतीच्या खाती न येता परस्पर संबंधित ठेकेदारास अदा करण्यात आल्या असून याकरीता या विभागाचे विद्यमान ज़िल्हा परिषद सदस्य यांनी शिफारशी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, ज़िल्हा परिषद सातारा यांचेकडे पोतेकरवाडी तसेच कुंभारगाव ग्रामस्थांनी याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करणेसंदर्भात लेखी तक्रारीही केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन अज्ञाताविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच योजनेच्या कामामध्ये जादा अदायगी झालेली रक्कम संबंधिताकडुन वसुल करण्यात आली आहे.तसेच जादा अदायगीसंबंधी झालेल्या अनियमितेबाबत श्री.आर. व्ही.पाटील, उप अभियंता व श्री.एस.एम. थोरात, शाखा अभियंता यांच्या विरुध्द विभागिय चौकशी सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील गुहागर, चिपळूण व खेड तालुक्यातील अल्पसंख्यांक वस्तीमधील विकासकामांना निधी उपलब्ध होत नसलेबाबत

**(२६) ६७२४९ (०७-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील गुहागर, चिपळूण व खेड तालुक्यातील अल्पसंख्याक वस्तीमधील विकासकामांना निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी दिनांक २ मे, २०१६ रोजी पासून सातत्याने करीत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे,

(२) असल्यास, संबंधित विकासकामांची यादी शासनाला वेळोवेळी देवूनही निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०२-२०१७) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) रत्नागिरी जिल्हयातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्र विकास या योजनेतंर्गतखालील प्रमाणे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

| जिल्हा रत्नागिरी | सन २०१३ - २०१४ | सन २०१४ - २०१५ | सन २०१५ - २०१६ | सन २०१६ - २०१७ |
|---|---|---|---|---|
| गुहागर ता. | रु.१०.०० लक्ष | -- | रु.१०.०० लक्ष | -- |
| चिपळूण ता. | रु.१९.९५ लक्ष | -- | ७५ लाख+ १७ लाख २८-१२-१६ (दि.३१-३-१६) मधील BDS या प्रणालीवर अवितरित निधी) रु.९२. लाख ======= | रु.१०.०० लक्ष |
| खेड | रु.१८.५० लक्ष | -- | रु.१०.०० लक्ष | -- |
| एकूण - | ४८,४५,०००/- | -- | १,१२,००,०००/- | १०,००,०००/- |

रत्नागिरी जिल्ह्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास या योजनेतंर्गत खालीप्रमाणे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

| जिल्हा रत्नागिरी | सन २००९ - २०१० | सन २०१० - २०११ | सन २०११ - २०१२ | सन २०१२ - २०१३ | सन २०१३ - २०१४ | सन २०१४ - २०१५ | सन २०१५ - २०१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रत्नागिरी न.पा. | रु.१० लक्ष | -- | रु.१० लक्ष | रु.१० लक्ष | -- | रु.१० लक्ष | रु.३९.२५ लक्ष |
| चिपळूण न.पा. | रु.१० लक्ष | -- | रु.१० लक्ष | रु.९.४७ लक्ष | -- | रु.९.७२ लक्ष | -- |
| खेड न.पा. | रु.१० लक्ष | -- | -- | -- | -- | -- | रु.१० लक्ष |
| एकूण | रु.३० लक्ष | -- | रु.२० लक्ष | रु.१९.४७ लक्ष | -- | रु.१९.७२ लक्ष | रु.४९.२५ लक्ष |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला अंतर्गत उत्तमनगर, शिवणे, कोंढवे-धावडे, न्यू-कोपरे (ता.हवेली, जि.पुणे) गावातील घरगुती वापराचे पाणी दर कमी करण्याबाबत**

**(२७) ६७३२३ (१६-१२-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला अंतर्गत उत्तमनगर, शिवणे, कोंढवे-धावडे, न्यू-कोपरे (ता.हवेली, जि.पुणे) गावातील रहिवाशांकडून आकारण्यात येणारे घरगुती वापराचे पाणी दर अन्यायकारक असल्याची बाब माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची दरवाढ कमी करणेबाबत उक्त चारही ग्रामपंचायतींनी ठरावाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या लेखी पत्रासह महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाकडे निवेदने पाठविली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर दरवाढ कमी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०२-२०१७) :** (१) व (२) होय.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत आकारण्यात येणारी पाणीपट्टी ही योजनांच्या देखभाल दुरुस्तीच्या खर्चावर अधारित असल्याने ती कमी करणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**३५ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील महाराष्ट्राच्या पदकप्राप्त खेळाडूंना रोख पारीतोषिकेवितरित करण्याय होत असलेला विलंब**

**(२८) ६७३९४ (१६-१२-२०१६). श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केरळ येथे दिनांक ३१ जानेवारी, २०१५ ते दिनांक १४ फेब्रुवारी, २०१५ या कालावधीतील आयोजित ३५ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील महाराष्ट्राच्या पदकप्राप्त खेळाडूंना रोख पारितोषिके अद्यापही वितरीत करण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदक प्राप्त खेळाडू, क्रीडा प्रेमींमध्ये यामुळे नाराजीचे वातावरण निर्माण झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, आशियायी स्पर्धांमध्ये सहभागी होऊन पदक मिळविलेल्या राज्याच्या खेळाडूंना देखील रोख पारितोषिके देण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त पारितोषिकाच्या विरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१७) :** (१) व (२) होय.

(३) व (४)

इचिऑन, दक्षिण कोरिया येथे सन २०१४ मध्ये संपन्न झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडूंना रोख पारिता षिकाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तथापि, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेतील महाराष्ट्राच्या पदकप्रापत खेळाडूंना द्यावयाच्या रोख पारितोषिकांचा सुधारित प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सहा जिल्ह्यातील पाणीटंचाईबाबत**

**(२९) ६७६३७ (१६-१२-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडला असला तरी धुळे जिल्ह्यासह नगर, पुणे, सांगली, सातारा व औरंगाबाद जिल्ह्यांच्या टंचाईग्रस्त भागात पाऊस उशिरा पडला असल्याने उक्त भागातील भूजल पातळीतही वाढ झाली नसल्याने व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांना पाझर फुटलेले नसल्याने पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावे लागत असल्याची माहिती राज्याच्या पाणीपुरवठा विभागाला माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टँकरवर अवलंबून असलेल्या राज्यातील गावे व वाड्यांची संख्या व त्यांना पुरविण्यात येणाऱ्या पाण्यासाठी किती टँकरचा वापर करण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्यात दिवसेंदिवस पाणी टंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०२-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक ०३.१०.२०१६ च्या साप्ताहिक टँकर अहवालानुसार राज्यात एकूण ४५ गावे व २२६ वस्त्या याकरिता ५९ टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.
(३) राज्यातील पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना राबविण्याकरिता टंचाई कालावधीत जिल्हानिहाय पाणी टंचाई कृती आराखडा मंजूर करुन आवश्यकतेप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) शांतीनगर भागातील शिधावाटप दुकानदाराविरूध्द कारवाई करण्याबाबत**

**(३०) ६७६५६ (१६-१२-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील शांतीनगर भागातील शिधावाटप दुकान क्र. २४३ चे मालक श्री. नौशाद खान हे मनमानी कारभार करीत असून लाभार्थ्यांना नियमित धान्य व रॉकेल न देणे, सतत फेऱ्या मारायला लावणे, शिधावाटपाचे धान्य व रॉकेल यांची काळ्या बाजारात विक्री करीत असून सर्वसामान्य गरीब, गरजू लाभार्थ्यांचेआर्थिक नुकसान करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी, समाजसेवी संस्था व संघटना यांनी जिल्हा शिधावाटप नियंत्रकांकडे दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शिधावाटप दुकान मालकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०२-२०१७) :** (१) व (२) होय. तथापि, सदर शिधावाटप दुकान क्र. २४३ चे प्राधिकार पत्र श्री. नौशाद खान यांचे नावे नसुन श्रीमती खुर्शिद अखतर रईस अहमद शेख यांच्या नावाने मंजूर आहे.

(३) अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ३७ फ/२४३ या दुकान तपासणीच्या अनुषंगाने तपासणीमध्ये गंभीर दोष आढळून आल्याने सदर दुकानाविरुध्द जिवनावश्यक वस्तू कायदा १९५५ मधिल ३ व ७ तरतूदीचा भंग केल्याने त्यांच्याविरुध्द शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्रमांक I।५८/२०१५, दिनांक ०७.०४.२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला व दिनांक १०.०४.२०१५ रोजी दुकान निलंबित करण्यात आले. सदर निलंबन आदेशास दिनांक ३.११.२०१५ रोजी शासनाने स्थगिती दिली व दाखल झालेल्या गुन्हया प्रकरणी होणाऱ्या न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून दुकान पूर्ववत करण्यात आले आहे.

माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार सदर रास्तभाव दुकानाचे दि. १.९.२०१६ ते दि. ३०.९.२०१६ या कालावधीत सेल ऑफटेक घेण्यात आले आहे. सेल ऑफटेक नंतर सदर दुकानात ९५२ शिधापत्रिका असून त्यामध्ये २६९ शिधापत्रिका नव्याने समाविष्ठ करण्यात आल्या व पूर्वीच्या यादीतील ६८३ शिधापत्रिकाधारक हजर झाले व ३३२ शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या. सद्यस्थितीत दुकानाबाबत कोणतीही तक्रार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथे केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी) योजनेतील संगणक शिक्षकांनी कायम सेवेत घण्याची मागणी**

**(३१) ६७७९१ (०५-०१-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे केंद्र व राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी) योजनेतील संगणक शिक्षकांना कायम सेवेत घेण्याची मागणी करीत सीएसटी जवळ रास्ता रोको आंदोलन केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच धुळे जिल्हयासह राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख करून देणारे माहिती संप्रेशन व तंत्रज्ञान योजनेतंर्गत कार्यरत असणाऱ्या संगणक निदेशक शिक्षकांना कमी करण्यात येत असून त्यांच्यावर बेरोजगारीचे संकट कोसळले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर राज्यांमध्ये या लॅब बंद करतांना या शिक्षकांसाठी पदे निर्माण करून पुनर्वसन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संगणक शिक्षक, निदेशकांचे पुनर्वसन तसेच ज्या शाळांमध्ये संगणक शिक्षक कार्यरत आहेत तिथेच पदनिर्मिती करुन या संगणक संप्रेषण यांना कायम सेवेत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१७) :** (१) अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त झालेले नाही
(२) व (३) आयसीटी योजनेंतर्गत निविदेनुसार निवडण्यात आलेल्या ऑपरेटर्स यांच्यासमवेत झालेल्या करारानुसार संगणक निदेशक कंत्राटी तत्वावर संबंधित ऑपरेटरकडून नियुक्त करण्यात येतात.
(४) व (५) आयसीटी योजनेंतर्गत एजन्सीबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यातील कलम ८.५ नुसार ऑपरेटर द्वारा नियुक्त करण्यात आलेल्या संगणक निदेशकांना शासन सेवेत सामावून घेण्याचा तसेच कायम सेवेचे फायदे घेण्याचा कोणताही अधिकार असणार नाही. त्यामुळे सेवेत कायम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही

---

## यळगुड, (ता. हातकणंगले) येथील हनुमान आखाडा या तालीमीची झालेली दयनीय अवस्था

**(३२) ६७८७९ (१६-१२-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यळगुड ( ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील हनुमान आखाडा या तालीमीची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालीमीची दुरुस्ती करण्यासंदर्भात ग्रामपंचायत प्रशासनाकडे वारंवार तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या तालीमीच्या दुरुस्तीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) हनुमान आखाडा ही तालीम ग्रामपंचायत, यळगुड या स्थानिक स्वराज्य संस्थेची असून दुरुस्ती करण्यासंदर्भात तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) शासन निर्णय दिनांक १ मार्च, २०१४ अन्वये कुस्ती सारखा पारंपारिक क्रीडा प्रकार जिवंत ठेवण्याकरीता तालीम कुस्ती केद्रांच्या विकासाला चालना देण्यासाठी योजना कार्यान्वित आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २२ जानेवारी, २०१४ अन्वये व्यायामशाळा विकास अनुदान ही योजना कार्यान्वित आहे. सदर योजनेतंर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी संबंधित संस्थांनी विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेकडे आवश्यक कागदपत्रासह सादर करणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील विवेकानंद तंत्रनिकेतन, सितासांवगी येथील प्राचार्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पाच वर्षापासून मानधन दिले नसल्याबाबत**

**(३३) ६८३६८ (२७-०१-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील विवेकानंद तंत्रनिकेतन, सितासांवगी येथील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी प्राचार्यांच्या विरोधात पाच वर्षापासूनचे प्रात्यक्षिके व लेखी परीक्षाचे मानधन दिले नसल्याची तक्रार दिनांक ३ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास संचालक महाराष्ट्र राज्य तंत्रनिकेतन मंडळ मुंबई, यांच्याकडे केली असल्याचे दिनांक २० ऑक्टोंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीची तात्काळ चौकशी करुन अहवाल सादर करावे असे आदेश सचिव महाराष्ट्र राज्य तंत्रनिकेतन मंडळ मुंबई, यांनी दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास, उपसचिव महाराष्ट्र राज्य तंत्रनिकेतन मंडळ विभागीय कार्यालय नागपूर, यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारीची चौकशी करण्याकरीता आचार्य श्रीमान्नारामण तंत्रनिकेतन वर्धा येथील तीन सदस्यांची समिती नियुक्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासदंर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) भंडारा जिल्हयातील विवेकानंद तंत्रनिकेतन, सितासावंगी येथील प्राचार्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना पाच वर्षापासून मानधन दिले नसल्याबाबत केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ५ हजार आयसीटी प्रयोगशाळा शिक्षकांना आठ महिन्यापासून वेतन न मिळाल्याबाबत**

**(३४) ६८५२६ (१६-१२-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५ हजार आयटीसी प्रयोगशाळा शिक्षकांना गत आठ महिन्यापासून वेतन

मिळाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर आयसीटी शिक्षकांना थकीत असलेले वेतन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०२-२०१७) :** (१) हे खरे आहे

(२) व (३) सप्टेंबर २०१६ पर्यंतचे वेतन संगणक शिक्षकांना अदा करण्यात आले आहे.

---

**भिवंडी शहरातील शिवाजी चौक येथील चाचा नेहरु हिंदी हायस्कूल मधील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण विषयाच्या प्रश्न पत्रिकेत चुकीचा प्रयन विचारल्याबाबत**

**(३५) ६९११३ (१६-१२-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील शिवाजी चौक येथील चाचा नेहरु हिंदी हायस्कूल मधील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण विषयाच्या प्रश्न पत्रिकेत प्रसिध्द क्रिकेटपटू विराट कोहलीची गर्लफ्रेंड कोण असा लेखी प्रश्न विचारण्यात आल्याची बाब दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उप शिक्षक मनोज रॉय यांनी तयार केलेली प्रश्नपत्रिका तपासण्याचे व त्याला अंतिम स्वरुप देण्याचे काम मुख्याध्यापकांचे असतानाही त्यांनी ती जबाबदारी पार न पाडल्याबद्दल त्यांचेविरुध्द काय कारवाई करण्यात करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, शासनाने भविष्यात असे प्रकार टाळण्याकरिता काही आचारसंहिता व नियम आखून देण्याचे धोरण निश्चित केले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) श्री.मनोज रॉय यांना चौकशीच्या अधीन राहून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयातील पदे मंजुर असतानाही तात्पुरत्या स्वरुपात पदे भरल्याबाबत**

**(३६) ६९२२७ (१६-१२-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्यवर्ती कार्यालयाने १२ वर्षापूर्वी उपअभियंताची ८०

पदे मंजूर असतानाही सहाय्यक अभियंता या पदांना तात्पूरत्या स्वरुपात अभावित अभियंता म्हणून बढती दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगांकडून उमेदवार न मागितल्याने सन २००३ पासून बेरोजगार सुशिक्षित स्थापत्य पदवीधारकांवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभावित अभियंत्यांवर अन्याय होऊ नये, यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-०२-२०१७) :** (१) होय.
(२) नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक परिस्थिती ठीक नसल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे नियमित मागणी केली गेलेली नाही.
(३) व (४) अभावित पदोन्नती ही तात्पुरती प्रशासकीय कामासाठी केलेली तात्पुरती व्यवस्था असते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील स.अ.श्रे-२ मधील अभियंत्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कोट्यातील सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहायक अभियंता श्रेणी- १ या पदांवर अभावित पदोन्नती दिली आहे. ही पदोन्नती देतांना सदर कोट्यातील नियमित उमेदवार उपलब्ध होताच त्यांची अभावित पदोन्नती संपुष्टात येईल, असे त्यांच्या पदोन्नतीच्या आदेशात स्पष्ट नमुद केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभावित अभियंत्यांवर अन्याय होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हातील तसेच वरोरा तालुक्यातील बोअरवेल बंद असल्याबाबत

**(३७) ६९७८५ (१६.१२.२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा (जि. चंद्रपूर) तालुक्यातील ४० पेक्षा जास्त बोअरवेल व संपूर्ण चंद्रपूर जिल्हात ९०० पेक्षा जास्त बोअरवेल गेल्या कित्येक महिन्यापासून बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे सदर तालुक्यातील नागरिकांना पाण्याकरिता वणवण करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बोअरवेल बंद असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने यांस जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच सदर ठिकाणातील गावांना नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-०२-२०१७) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दुरुस्तीच्या साहित्याच्या अडचणींमुळे १५ तालुक्यांतील विविध गावातील १६६ हातपंप नादुरुस्त होते. तातडीने साहित्य प्राप्त करुन घेऊन सदर नादुरुस्त पंपाची दुरुस्ती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत जिल्हयामध्ये सुरळीत व नियमित रित्या हातपंप दुरुस्तीची कार्यवाही सुरु असुन कुठलीच अडचण नाही.

(२) हे खरे नाही. हातपंपाच्या देखभाल दुरुस्ती कामाकरिता जिल्हयातील एकुण १५ पंचायत समितीसाठी प्रत्येकी १ या प्रमाणे एकुण १५ वाहने उपलब्ध आहेत, यासाठी जिल्हयामध्ये पंचायत समिती स्तरावर ट्रायसेम योजनेअंतर्गत एकुण ६९ ट्रायसेम कंत्राटदारांकडुन नादुरुस्त हातपंपाची दुरुस्ती नियमितरित्या होत असल्यामुळे नागरिकांना पाण्याकरिता वणवण करावी लागत नाही.

(३) बंद बोअरवेल दुरुस्त करण्यात आल्याने बोअरवेल सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) सदर गावांमध्ये नियमित पाणीपुरवठा सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुरखेडा (जि.चंद्रपूर) येथील नविन पाणी पुरवठा योजनेच्या पाईपलाईन विस्तारीकरण कामात झालेला गैरव्यवहार**

**(३८) ६९७९८ (१६-१२-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरखेडा (जि.चंद्रपूर) येथील नविन पाणी पुरवठा योजनेच्या पाईपलाईन विस्तारीकरण कामात तत्कालिन सरपंच व सचिवांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०७-०२-२०१७) :** (१) कुरखेडा हे गांव चंद्रपूर जिल्हयात नसून, गडचिरोली जिल्हयात आहे.

तथापि, हे खरे आहे. तत्कालिन सरपंच व सचिवांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना प्राप्त झाली आहे.

(२) त्यानुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कुरखेडा यांनी चौकशी केली असून, चौकशी अहवालानुसार ग्रामपंचायतीचे तत्कालिन सरपंच व सचिव हे दोषी असल्याचे आढळून आले आहे. संबंधित दोषींवर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे स्तरावरुन कारवाई सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात परिविक्षाधिन कालावधी पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकांना कायद्यानुसार नियमीत पगार सुरु करणे बाबत

**(३९) ७०२५३ (०५-०१-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिविक्षाधिन कालावधी पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकांना कायद्यानुसार नियमीत करुन त्यांचे पगार सुरु केले जातील असे स्पष्ट आश्वासन मा. शिक्षण आयुक्त यांनी एका संघटनेला दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्वासनाची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## मुंबईतील जय हिंद महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशप्रक्रियेत स्क्रॅच कार्ड पध्दतीचा अवलंबन केल्याबाबत

**(४०) ७०४८८ (१६-१२-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जय हिंद महाविद्यालयात विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशप्रक्रियेत तात्पुरता प्रवेश मिळण्याकरिता त्यांच्याकडून ५० रुपयांच्या अर्जासोबतच साठ रुपयांचे स्क्रॅच कार्ड विकत घेवून त्यांवर देण्यात आलेला सांकेतिक क्रमांक महाविद्यालयाच्या अर्जात नमुद करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्क्रॅच कार्ड पध्दतीने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येत असून त्यामुळे बहुतांश स्कॅच कार्डचा वापर न करणा-या विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशापासून वंचित रहावे लागत असल्याची बाब दिनांक २२ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महाविद्यालयात अकरावीच्या जागा उपलब्ध असून देखील स्कॅच कार्डद्वारे प्रवेश देण्याचे कारण काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानूसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) स्क्रॅच कार्डचा वापर न करणारा कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिलेला नाही.

(३) व (४) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून जयहिंद महाविद्यालयाने सदर रक्कम संकेतस्थळाच्या देखभालीसाठी आकारली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### विविध स्पर्धांच्या आयोजनासाठी निधीचे वाटपाबाबत

**(४१) ७०६२३ (१६-१२-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध स्पर्धांच्या आयोजनासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातही सर्वात जास्त निधी म्हणून ३१ लाखांपैकी १६ लाख रुपये विदर्भाला, तर मराठवाडा, उत्त्तर महाराष्ट्राला प्रत्येकी तीन लाख रुपये देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्वच विभागांना समान निधीचे वाटप न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) शालेय शिक्षण क्रीडा विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०१६ व तदनुषंगीक इतर शासन निर्णयामधील तरतुदीनुसार विविध संघटनांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्ना उद्‌भवत नाही.

---

### दहावी व बारावीच्या फेरपरिक्षेमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत

**(४२) ७०६७१ (२७-०१-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावी व बारावीच्या फेरपरिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहावी व बारावीच्या फेरपरिक्षाचा निकाल लागण्यापूर्वीच व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया संपुष्ठात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फेरपरिक्षेमध्ये ३२,९२९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्याची प्रवेश प्रक्रिया दिनांक १० सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास संपविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रवेश प्रक्रिया संपल्याने अनेक विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांना मुकावे लागले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने प्रवेश दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी पर्यंत पूर्ण करण्याचे निदेश दिले असूनही शासनाने याबाबत कोणतेही दखल घेतली नसून याबाबत शिक्षण विभागाचे धोरणच जबाबदार असल्याचा आरोप होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस एस सी पदविका व प्रथम वर्ष पोस्ट एच एस सी पदविका प्रवेश प्रक्रिया वगळुन उर्वरीत अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दहावी व बारावीच्या फेरपरिक्षाचा निकाल लागण्यापूर्वीच संपुष्टात आली होती.
(३), (४), (५) व (६) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार अभियांत्रिकी प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा अंतिम दिनांक १४ ऑगस्ट, २०१६ व प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा अंतिम दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ असा तंत्र शिक्षण संचालनालयाकडून निश्चित करण्यात आलेला होता.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये पदवी अभ्यासक्रमाकरीता केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरणे व कागदपत्र पडताळणीसाठी दिनांक २/६/२०१६ ते ५/८/२०१६ या कालावधीत नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली होती.

इयत्ता दहावी व बारावीच्या फेरपरिक्षेचा निकाल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने दिनांक २२/०८/२०१६ नंतर जाहीर केला होता. हा निकाल प्रवेश प्रकियेसाठी विहीत केलेल्या कालावधीनंतर लागल्यामुळे काही विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदविका/पदवी प्रवेश प्रक्रियेत भाग घेता आलेला नाही.

---

**शासकीय तंत्रनिकेतन पदवीका अभ्यासक्रम टप्पयाटप्पयाने**
**बंद करण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(४३) ७०९२२ (१६-१२-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील शासकीय तंत्रनिकेतन पदवीका अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद करण्याबाबतचा घेण्यात आलेला निर्णय अत्यंत चुकीचा असून या भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने शासकीय तंत्रनिकेतन पदवीका अभ्यासक्रम बंद करण्यात येऊ नये याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांना निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच, शासकीय तंत्रनिकेतन मधील डिप्लोमा बंद या शासन निर्णयाच्या विरोधात रत्नागिरी पॉलिटेक्निकच्या माजी विद्यार्थ्यांनी सोशल मिडीच्या माध्यमातून सेव्ह जीपीआर मोहिम सुरु केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त बाबीबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर जिल्हयात पुरेशा जागासह तंत्रनिकेतने अस्तित्वात असून या तंत्रनिकेतनांमध्ये विशेषत: सुधारीत राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना अत्यंत अल्प शुल्कात शिक्षण घेणे शक्य आहे. तसेच तंत्रनिकेतनातील बहुतेक सर्व पदविकाधारक विद्यार्थी हे पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेत असल्याचे निदर्शनास आल्याने या भागात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अस्तित्वात आल्यास ७०% स्थानिक विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचा लाभ घेणे शक्य होणार आहे. त्यामुळे येथील शासकीय तंत्रनिकेतनाचे (पदविका अभ्यासक्रम) श्रेणीवर्धन करून अभियांत्रिकी महाविद्यालयात (पदवी अभ्यासक्रम) रूपांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

## कऱ्हाड (जि.सातारा) येथील शिधावाटप धान्य दुकानदार तुरडाळ विकत घेण्याची ग्राहकांना करीत असलेली सक्ती

**(४४) ७०९५१ (१६-१२-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कऱ्हाड (जि.सातारा) येथे तूरडाळीच्या किंमतीत वाढ झाली असल्याने शिधापत्रिकाधारक शिधावाटपाची तूरडाळ विकत घेत नसल्याने स्वस्त धान्य दुकानदार तूरडाळ घ्या तरच शिधावाटपाचे धान्य दिले जाईल अशा प्रकारची सक्ती करीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरवठा विभागाकडून स्वस्त धान्य दुकानदारांना ग्राहकांच्या परिणामानुसार तूरडाळ विक्रीसाठी दिली जाते परंतू तुरडाळीच्या दर वाढीमुळे ग्राहक तुरडाळ खरेदी करीत नसल्याने स्वस्त धान्य दुकानदारांकडील सदर तूरडाळीची विक्री होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्वसामान्यांपर्यंत तुरडाळ पोहोचविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०२-२०१७) :**(१) व (२) नाही, हे खरे नाही.
कराड तालुक्यामध्ये ऑगस्ट २०१६ मध्ये २४० क्विंटल तुरडाळ दुकानदारांना देण्यात आलेली होती. सदरची तुरडाळ शिधापत्रिकाधारकांना नियमानुसार वाटप करण्यात आली असून दुकानदाराकडून शिधापत्रिकाधारकांना कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यात आलेली नाही. सद्यस्थितीत दुकानदाराकडे तुरडाळ शिल्लक नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथे क्रिडा संकुल उभारण्याचा निर्णय

**(४५) ७११६१ (१६-१२-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) येथे क्रिडा संकुल उभारण्याचा निर्णय घेऊन जागे अभावी क्रिडा संकुल अद्याप उभारण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागेचा प्रश्न सोडवून क्रिडा संकुल उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०१-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही. गडहिंग्लज तालुका क्रीडा संकुलासाठी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या दिनांक २१.०१.२०१६ च्या आदेशान्वये गडहिंग्लज येथील गायरान स.क्र.५५६/२ मधील ४ हेक्टर जागा प्राप्त झालेली आहे. सदर तालुका क्रीडा संकुल समितीच्या दिनांक २०.०६.२०१६ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार उप-मुख्यवास्तुविशारद सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचेकडे अंदाजपत्रक आराखडे तयार करण्याबाबत उप-अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, गडहिंग्लज यांचेमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक जिल्ह्यातील नांदगांव व ५६ खेडे या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेत करण्याबाबत.

**(४६) ७१२१८ (१६-१२-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगांव व ५६ खेडे या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचा संकल्पित कालावधी सन २००६ मध्ये संपुष्टात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संकल्पित कालावधी संपल्यामुळे योजनेत वारंवार बिघाड होवून या योजनेअंतर्गत असलेल्या गावांना सातत्याने पाणी टंचाई निर्माण होत असल्याने नागरिकांना पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेचे नुतनीकरण करण्याच्या कामाचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेत करण्याबाबतची मागणी लेखी पत्राद्वारे स्थानिक लोक प्रतिनिधी,नांदगाव यांनी दिनांक १५ फेब्रुवारी,२०१६ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री व मा. पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत उक्त मागणीच्या अनुषंगाने व पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०२-२०१७) :** (१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) होय.
(४) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या योजना दि.७ मे, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आल्या असून त्यामध्ये सदर योजनेचा समावेश नाही. तथापि, सदर कार्यक्रमामध्ये समाविष्ट असलेली एखादी योजना काही करणास्तव रद्द झाल्यास अन्य योजना घेण्याचे अधिकार मा.मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखालील समितीस आहे. मात्र सद्य: स्थितीत कोणतीही योजना वगळण्यात आलेली नाही.

मात्र ५.०० कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येतात. त्यानुसार मजीप्रामार्फत सदर योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांअंतर्गत सन २०१७-१८ च्या आराखड्यात प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच सदर योजनेत जलशुध्दीकरण केंद्रापासून दोन मुख्य झोन करण्यात आले असून झोन १ मध्ये नांदगाव शहर व १८ गावे व झोन २ मध्ये मालेगाव तालुक्यातील ३९ गावे व वाड्या/वस्त्यांचा समावेश होता. एखादया झोन मध्ये पाईप गळती किंवा तांत्रिक बिघाड झाल्यास त्वरीत दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### करणवाडी (ता. मारेगाव जि. यवतमाळ) येथील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४७) ७१२५३ (१६-१२-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करणवाडी (ता. मारेगाव, जि. यवतमाळ) येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत चौकशी होवून सुद्धा राजकीय दबावामुळे कार्यवाही न केल्याबाबत उक्त ठिकाणच्या नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०७-०२-२०१७) :**(१) होय.
(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, समितीने मुल्यांकनाव्यतिरिक्त जादा उचल केलेली रक्कम रु. २,२२,०२४/- चा भरणा केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गावांतील ग्रामस्थांना शुध्द पाणी मिळण्याबाबत

**(४८) ७२३३८ (१६-१२-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गावातील ग्रामस्थ अद्यापर्यंत नाल्याचे पाणी पित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावातील ग्रामस्थांना नियमित व शुध्द पाणी पुरवठा होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०७-०२-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

जिवती तालुक्यातील ७१ गावे व १८० वाडया/वस्त्यांपैकी १०४ गावात पाणी पुरवठा योजना आहेत. उर्वरीत ७६ गावात अस्तित्वातील हातपंप साध्या विहीरीद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

वरीलपैकी मौजा घाटराईगुडा ग्रामपंचायत, मरकागोंदी या एका गावातील योजनेचे विद्युत देयक थकीत असल्यामुळे नळ योजना मागील दोन वर्षापासून बंद होती. त्यामुळे पिण्याच्या पाण्याकरीता नैसर्गिक झऱ्याचा वापर करण्यात येत होता.

१४ व्या वित्त आयोगाचा निधी वापरुन विद्युत देयकाचा भरणा करण्यात आला व योजना पुन्हा कार्यान्वित करण्यात आली.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाने बनावट शिधापत्रिका तयार केल्याबाबत

**(४९) ७२४६५ (१६-१२-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाने सन १९९१-९२ ला लोकसंख्येपेक्षा जास्त बनावट शिधापत्रिका तयार करुन सदर पत्रिका स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ रॉकेल दुकानांना जोडण्यात आल्या प्रकरणी मा.न्यायालयाने

माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान २२ स्वस्त धान्य दुकानदारांना समन्स जारी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच प्रकरणी तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक १४ जानेवारी, २००५ मध्ये सादर केलेल्या अहवालामध्ये दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचा-यांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिका-यांनी देऊनही त्यावेळी त्यांचेवर कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी संबंधित दुकानदारांवर व दोषी अधिकारी/ कर्मचा-यांवर कोणत्या कलमानुसार कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०२-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे

देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाने सन १९९१-९२ ला लोकसंख्येपेक्षा जास्त बोगस शिधापत्रिका तयार करून त्या स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ रॉकेल दुकानांना जोडण्यात आल्याबाबतचे वृत्त दि.१९ सप्टेंबर, २०१६ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशित झाले होते. तथापि, या प्रकरणी न्यायालयाकडून समन्स जारी करण्यात आलेले नाही.

(२) व (३) उपरोक्त प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांनी दि.१४.१.२००५ रोजी केलेल्या चौकशीच्या अहवालानुसार तत्कालीन पुरवठा निरीक्षक दोषी असल्याचे आढळून आले आहे. यास्तव, सदर दोषी पुरवठा निरीक्षक यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून ते सध्या सेवानिवृत्त आहेत.

तसेच या प्रकरणी दोषी आढळून आलेल्या स्वस्त धान्य दुकानदार यांच्याविरूद्ध दि. महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज ॲक्ट,१९७५ अन्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे हिवरा बु.(ता. खामगाव,जि बुलढाणा) या गावातील ग्रामीण पेयजल योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५०) ७३७६६ (१६-१२-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हिवरा बु. (ता. खामगाव जि. बुलढाणा) या गावातील ग्रामीण पेयजल योजनेमध्ये मोठ्याप्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे पाण्याची टाकी मोठ्या प्रमाणात गळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत स्थानिक ग्रामवासियांनी उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा याच्या निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने टाकीच्या दुरुस्तीबाबत व संबंधितावर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०७-०२-२०१७) :**(१) होय.
डिसेंबर-२०१५ मध्ये तक्रार प्राप्त झाली आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.
सन २०१५ मध्ये उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, खामगांव यांचेकडे सदर योजनेबाबत तक्रार केली आहे. तथापि, पाण्याच्या टाकीच्या गळतीची बाब निदर्शनास आणून दिलेली नाही. योजनेतील पाण्याच्या टाकीचे काम प्रगतीत असून, अद्याप चाचणी घेणे बाकी आहे.
तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन, संबंधीत शाखा अभियंता व ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.